epaper.lokmat.com
पुणे, शनिवार, दि. ७ ऑक्टोबर २०२३ ३
लोकमत

# राजगुरुनगरचा वैष्णव ठाकूर ठरला बेस्ट लिफ्टर

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग (मुले व मुली) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे उद्‌घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. उमेश गायकवाड, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सचिव डॉ. उमेश पनेरू, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अण्णासाहेब मांडे, निवड समिती सदस्य प्रा. अनिल मरे, प्रा. शिवाजी भिंताडे, डॉ. शीतल शेंडकर, प्रा. पी.जी. शिंदे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच.एम. ज़रे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्रा. व्ही.बी. दौंडकर, पंच म्हणून पुणे जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे प्रशांत बेंद्रे उपस्थित होते.



राजगुरु महाविद्यालयाचा वैष्णव ठाकूर वेटलिफ्टिंग करताना.

या स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील विविध १६ महाविद्यालयांतील १९ मुली व २० मुलांनी सहभाग नोंदविला. यात मुलींच्या गटात तळेगाव येथील इंद्रायणी महाविद्यालयातील नम्रता कुंभार व मुलांच्या गटात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वैष्णव ठाकूर यांना बेस्ट लिफ्टर म्हणून गौरविण्यात आले.

या स्पर्धेतून निवडला जाणारा संघ हा १३ व १४ ऑक्टोबर २०२३ रोजी अमृतेश्वर महाविद्यालय, विंझर येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेकरिता पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळक यांनी केले, तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी केले.

Scanned with OKEN Scanner